प्रेस नोट दि. २६/०८/२०२२

# गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड आयुक्तालय यांची उल्लेखनीय कामगिरी

**गुन्हे शाखा युनिट -५ पिंपरी चिंचवड चे तपास पथकाने तळेगाव दाभाडे येथे झालेल्या महिलेच्या खुनाचा कौशल्यपुर्ण तपास करुन गुन्ह्यातील आरोपींना केले जेरबंद**

तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन गु.र.नं. ३७० /२०२२ भा.दं.वि.क. ३०२,१२०(ब),३४ प्रमाणे दाखल खुनाचे गुन्ह्याचा समांतर तपास करुन गुन्हा उघडकीस आणण्याचे मा.पोलीस आयुक्त सो.पिंपरी चिंचवड यांनी आदेश दिले होते. मा.पोलीस आयुक्त सो. यांनी दिलेल्या आदेशा प्रमाणे मा. अपर पोलीस आयुक्त सो., मा.पोलीस उप-आयुक्त सो गुन्हे शाखा व मा.सहा.पोलीस आयुक्त सो, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट -५ चे मनोज खंडाळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी पोलीस उप-निरीक्षक राहुल कोळी, सपोफौ किरनाळे, पोहवा ७१८ बनसुडे, पोहवा ९७६ बहीरट, पोहवा १००९ ठाकरे, पोहवा ८५८ राठोड, पोना १६०८ मालुसरे, पोशि १३०५ खेडकर, पोशि १३०३ इघारे पोशि २०१७ भोसले, पोशि १८९८ गाडेकर, पोशि २१९२ ब्रम्हांदे, पोशि २५७१ गुट्टे यांच्या वेगवेगळ्या टिम करुन तपास चालु केला. तपासा दरम्यान तांत्रिक विश्लेषण करण्यात आले, तसेच सदर मयत महीलेचे नातेवाईक व संबधित लोकाकडे तपास करण्यात आला परंतु गुन्ह्याचे तपासाचे अनुषंगाने उपयुक्त माहिती मिळुन येत नव्हती. त्यामुळे वरील तपास पथकाच्या सदर महिलेचा खुन हा नियोजनबध्द करण्यात आला असल्याचे लक्षात आले. त्यानंतर तपास पथकाने तपासाची दिशा बदलुन सखोल तपास करुन आरोपी गेल्याचा माग काढत तळेगाव दाभाडे ते चिंबळी असा ६० ते ६५ कि.मी. आरोपीचा माग काढला तसेच आरोपी राहता असलेल्या ठिकाणी आजुबाजुच्या इसमांकडे चौकशी करुन तसेच पुढे तांत्रीक विश्लेषन करुन आरोपीना ताब्यात घेवुन त्यांच्याकडे कसुन चौकशी केली असता आरोपी बजरंग मुरलीधर तापडे व मयत महिला संगिता बाळासाहेब भोसले यांच्यात मागील दोन वर्षापासून संबंध होते. मागील काही महिन्यांपासून संगीता भोसले हीने आरोपी बजरंग तापडे याला लग्न करण्यासाठी तगादा लावला होता. आरोपी बजरंग तापडे हा विवाहित असल्याने व तीन मोठी मुले असल्याने तिचेसोबत लग्न करणे शक्य नव्हते त्यामुळे आरोपी बजरंग तापडे याने त्याचा जवळचा मित्र पांडुरंग हारके यांस सांगून मयत संगिता भोसले हीचा खुन करण्याची योजना आखली. त्यासाठी आरोपी बजरंग तापडे याने पांडूरंग हारके यांस ७,००,०००/- रुपये सुपारी ठरवून त्यातील ४,००,०००/- रुपये रोख ॲडव्हान्स दिला त्याप्रमाणे आरोपी पांडूरंग हारके याने त्याचे ओळखीचा व गुन्हेगारी वृत्तीचा मित्र सचिन प्रभाकर थिगळे रा. गुप्ता हॉस्पिटलजवळ, चिखली ता.चिखली जि. बुलढाणा यांस आळंदी येथे बोलावून मयत संगिता भोसले हिचा फोटो व तिचे राहण्याचा पत्ता व नेहमी जाण्या-येण्याचा मार्ग अशी सर्व माहिती समक्ष तळेगाव दाभाडे येथे नेवून समक्ष दाखविली व खुनाची सुपारीतील १,००,०००/- रुपये रोख ॲडव्हान्स दिले. त्याप्रमाणे आरोपी सचिन थिगळे याने त्याचा मित्र आरोपी सदा ऊर्फ सॅन्डी पुर्ण नाव पत्ता माहीती नाही यांनी मयत संगिता भोसले हिचे घराची तसेच तिचे वडिलांचे दुकानाची तेथील रस्त्यांची रेकी करुन खुन केल्यानंतर सोईस्कररित्या पळुन जाण्यासाठी मार्गाची काही दिवसांपुर्वी पाहणी केली व त्याप्रमाणे दि.०९/०८/२०२२ रोजी सकाळी ०८:०० चे सुमारास संगिता भोसले ही नेहमीप्रमाणे तिचे वडिलांचे दुकानावर विक्रीसाठी दुध पिशव्या पोहचवून तिचे स्कूटीवर परत घराकडे येत असताना आरोपी सचिन थिगळे व त्याचा मित्र सदा उर्फ सॅन्डी यांनी लाल रंगाचे ॲव्हेंजर गाडीवर येवून इंद्रपुरी कॉलनीकडे जाणारे रोडवर भंडारी व्हिलाचे बाजूला रस्त्याला संगिता भोसले हिची स्कूटी अडवून तिला खाली उतरवून तिची केस पाठीमागून पकडून धारदार चाकूने गळा चिरुन खुन केला आहे व तात्काळ घटनास्थळावरुन कोणलाही संशय येवू नये अशा पद्धतीने नियोजित मार्गाने पळ काढला होता.

तरी तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन गु.र.नं. ३७० /२०२२ भा.द.वि.क. ३०२ प्रमाणे दाखल गुन्ह्यातील मयत महिला संगीता बाळासाहेब भोसले रा.मंत्रा बिल्डींग तळेगाव दाभाडे ता. मावळ जि. पुणे हिचा आरोपी नामे १) बजरंग मुरलीधर तापडे , वय ४५ वर्षे, सध्या रा. श्री नगरी सोसायटी एच. बिल्डींग खाडंगे पेट्रोल पंपाच्या समोर तळेगाव दाभाडे ता. मावळ जि. पुणे मुळ रा. बनसारोळा ता.केज जि.बीड २) पांडुरंग ऊर्फ सागर बन्सी हारके, वय ३५ वर्षे, धंदा-ड्रायव्हर, सध्या रा. संत कृपा कॉलनी, आदर्शनगर मोशी, ता. हवेली जि. पुणे मुळ रा. किल्ले धारुर ता.धारुर जि.बीड ३) सचिन प्रभाकर थिगळे ,वय ३० वर्षे, धंदा - ड्रायव्हर, रा. गुप्ता हॉस्पिटजवळ चिखली, ता.चिखली जि.बुलढाणा तसेच पाहिजे आरोपी ४) सदानंद रामदास तुपकर वय. २६ रा. मोटेखेड ता. चिखली जि. बुलढाणा यांनी संगणमत करुन खुन केला असलेबाबत तपासात निष्पन्न झाले आहे. यातील आरोपी क्र. १ ते ३ यांना गुन्हे शाखा युनिट – ५ यांनी कौशल्यपुर्ण तपास करुन यातील आरोपींना शिताफीने पकडले. तर यातील आरोपी क्र. ०४ यास पोलीस ठाणे तळेगाव दाभाडे यांनी पकडुन जेरबंद केले आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त श्री. अंकुश शिंदे , मा. अपर पोलीस आयुक्त श्री. संजय शिंदे , मा.पोलीस उप-आयुक्त श्री. काकासाहेब डोळे , मा.सहा.पोलीस आयुक्त श्री.प्रशांत अमृतकर, यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे व सुचनाप्रमाणे वरिष्ट पोलीस निरीक्षक श्री.मनोज खंडाळे, गुन्हे शाखा युनिट ५, यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि श्री.राहुल कोळी, सपोफौ किरनाळे, पोहवा ७१८ बनसुडे, पोहवा ९७६ बहीरट, पोहवा १००९ ठाकरे, पोहवा ८५८ राठोड, पोना १६०८ मालुसरे, पोशि १३०५ खेडकर, पोशि १३०३ इघारे पोशि. २०१७ भोसले, पोशि १८९८ गाडेकर, पोशि २१९२ ब्रम्हांदे, पोशि २५७१ गुट्टे, तसेच तांत्रिक विश्लेषण शाखेकडील सपोफौ/राजेंद्र शेटे, पोहवा/नागेश माळी, पोशि/पोपट हुलगे यांनी केली आहे.

(डॉ.काकासाहेब डोळे)
पोलीस उप-आयुक्त,गुन्हे